# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि/475/2020** **दिनांक: 05/06/2020**

**वाचा** — 1. **आपत्ती व्यवस्थापन कायदा** — 2005
2. **महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक** 13 **मार्च**, 2020
3. **साथरोग अधिनियम**,1897
4. **जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांचे पत्र जा.क्र. जिशचि**/8585-86/2020 **दिनांक** 20.5.2020

**कोव्हीड-१९ च्या रुग्णांना म.ज्यो.फु.ज.आ.यो. व प्र.स.म.ज.आ. योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालय मुनष्यबळासह अधिग्रहीत करणे बाबत.**

## *आदेश*

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड – 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि,**

**ज्याअर्थी**, राज्यामध्ये दिनांक 26.02.2019 च्या शासननिर्णयाच्या सुधारीत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांना संगीनीकृत करुन एकत्रीत स्वरुपात मे. युनायटेड इन्शुरंन्स कंपनीच्या सहकार्याने दिनांक 1.4.2020 पासून अंमलात आली आहे. या संदर्भात शासन निर्णयानुसार कोव्हीड-19 च्या सर्व रुग्णांना योजनेच्या अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये लाभ घेता येईल. असे जिल्हा शल्य चिकित्सक , सर्वोपचार रुग्णालय अकोला यांनी कळविले आहे.

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर**,**भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला, आपत्ती व्यवस्थापन कायदा**- 2005, **साथरोग अधिनियम** 1897 **मधील खंड** 2, 3 **व** 4 **व महाराष्ट्र शासनाची दिनांक** 14 **मार्च** 2020 **चे अधिसूचना** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, जिल्हा शल्य चिकित्सक , सर्वोपचार रुग्णालय अकोला यांनी कळविल्यानुसार जिल्हयामध्ये येणा-या कोव्हीड-19 रुग्ण संख्येमध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे व शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात रुग्णसेवेचा भार जास्त प्रमाणात वाढलेला असल्यामुळे नोंदणीकृत Dedicated Covid Health Center ग्लोबल हॉस्पीटल, सिव्हील लाईन अकोला हे रुग्णालय मनुष्यबळासह याद्वारे अधिग्रहीत करण्यात येत असल्याबाबतचे आदेश पारीत करित आहे.

1. **Dedicated Covid Health Center म्हणून अधिग्रहीत करण्यात आलेल्या ग्लोबल हॉस्पीटल मध्ये आवश्यकतेनुसार रुग्णांना भरती करण्यात येईल.**
2. **अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला व जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांनी ग्लोबल हॉस्पीटल मध्ये कोणत्या रुग्णांना भरती करावयाचे आहे या बाबत संयुक्तीक निर्णय यावा.**
3. **व्यवस्थापक, Dedicated Covid Health Center ग्लोबल हॉस्पीटल, सिव्हील लाईन अकोला यांनी विनाविलंब रुग्णालय जिल्हा शल्यचिकित्सक , सर्वोपचार रुग्णालय अकोला यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही करावी.**

4. **ग्लोबल हॉस्पीटल मध्ये भरती असणा-या इतर रुग्णांना संक्रमन होणार नाही याबाबत अधिष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला व जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्या.**

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक 5 जून** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी –**

१. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
२. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
३. आयुक्त, महानगरपालिका अकोला
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
५. जिल्हा शल्य चिकित्सक सर्वोपचार रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
६. व्यवस्थापक, Dedicated Covid Health Center ग्लोबल हॉस्पीटल, सिव्हील लाईन अकोला
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
८. उपविभागीय अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
९. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला